**"जानेवारी २०१९" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ३ जानेवारी २०१९ च्या शासन ज्ञापनान्वये निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ३ उमेदवारांचे मंत्रालयीन विभागात नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक ८ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेच्या वेतनेकरिता निधीची मागणीनुसार विकास, प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन खर्चासाठी वेतनेतर रु.६.०० लाख व वेतने रु.१८.०० लाख असे एकूण रु.२४.०० लाख इतकी तरतूद अनुक्रमे अनिवार्य ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) व ३६-सहायक अनुदान (वेतने) याखाली वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ८ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या वेतने व वेतनेतर करिता निधीची मागणीनुसार विकास, प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन खर्चासाठी वेतनेतर रु.१०.०० लाख व वेतने रु.२५.०० लाख असे एकूण रु.३५.०० लाख इतकी तरतूद अनुक्रमे अनिवार्य ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) व ३६-सहायक अनुदान (वेतने) याखाली वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक १४ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ करिता वनामती, नागपूर या संस्थेस जानेवारी ते मार्च २०१९ करिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.५.१५ लाख इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.
- दिनांक १४ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये Apex Scale – Level-१७ in the Pay Matrix या संवर्गात सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.एआयएस-१०१६/प्र.क्र.६८५/२०१६/दहा, दिनांक १ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपात निर्माण केलेल्या दोन पदांना दिनांक ३१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक १४ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये Apex Scale – Level-१७ in the Pay Matrix या संवर्गात दोन पदे तात्पुरत्या स्वरुपात (१ पद दिनांक १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यत आणि १ पद दिनांक १५ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यत) निर्माण करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक १५ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये Apex Scale – Level-१७ in the Pay Matrix या संवर्गात दोन पदे तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १५ जानेवारी ते ३१ ऑगस्ट २०१९ पर्यत) निर्माण करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक १५ जानेवारी २०१९ च्या शासन शुद्धीपत्रान्वये गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकारी यांची विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी ६ इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची एकत्रित सामायिक यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १५ जानेवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये उधार पतविक्रीव्दारे संबंधित विभागास पुरवठा करण्यात आलेल्या देयकांचा बँकेत NFT / ECS व्दारे यापूर्वी भरणा केलेल्या रकमांचा तसेच यापुढे भरणा करण्यात येणाऱ्या रकमांचा तपशील मंत्रालय उपाहारगृह कार्यालयास कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक १७ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सेवेतील अवर सचिव, वरिष्ठ स्वीय सहायक, कक्ष अधिकारी व निवडश्रेणी लघुलेखक या संवर्गातील पदावर पदोन्नतीसाठी निवडसूची तयार करण्यासाठी विभागीय पदोन्नती समिती क्रमांक-१ ची पुनर्रचना करण्यात आली आहे.
- दिनांक १९ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यसेवा (मुख्य) परीक्षा २०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण (सीपीटीपी-४/अ) कालावधीकरिता रु.९३०००-३४८००, ग्रेड वेतन रु.४८०० या वेतनश्रेणीत ७ अधिसंख्य पदे दिनांक १६ जानेवारी २०१९ ते २० जानेवारी २०२१ पर्यंत निर्माण करण्यात आली आहेत.
- दिनांक २१ जानेवारी २०१९ च्या शासन ज्ञापनान्वये  सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादीतील शिफारस केलेल्या १७ उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभागात सहायक कक्ष अधिकारी पदावर नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक २५ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाकरिता सी.बी.डी.बेलापूर येथील नियोजित मंजूर भूखंडावर इमारत बांधण्याच्या अनुषंगाने भूविकास व सर्वेक्षणाच्या कामासाठी रु.१४,८९,७१५/- इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ३१ जानेवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१६-१७ या प्रतिवेदन वर्षासाठी गट-अ संवर्गातील निवडक १२ सेवांमधील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्याबाबत सूचना केल्या आहेत.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- कक्ष अधिकारी-३, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका कक्ष अधिकाऱ्याच्या बदलीस स्थगिती देण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याची बदली रद्द करण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आले आहे.
- उपसचिव-१०, अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, वरिष्ठ स्वीय सहायक-१ अशा १३ अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- सहायक कक्ष अधिकारी-१, उच्चश्रेणी लघुलेखक-२  अशा ३ कर्मचाऱ्यांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- एका उच्चश्रेणी लघुलेखकाला प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-३, उच्चश्रेणी लघुलेखक-१ अशा ५ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले.
- एका कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १ जानेवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या दिनांक १ जानेवारी १९८६ रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १ जानेवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहाकय कक्ष अधिकारी यांची दिनांक १ जानेवारी १९८६ रोजीची अंतरिम सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक १५ जानेवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील वाहन चालक संवर्गामधील कर्मचाऱ्यांची दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक १५ जानेवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड संवर्गामधील कर्मचाऱ्यांची दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**(च) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक २२ जानेवारी २०१९ च्या शासन पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गात कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नत झालेल्या ५० अधिकाऱ्यांसाठी कुंडल ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट, मु.पो.कुंडल, ता.पलुस, जि.सांगली या संस्थेमार्फत दिनांक ४ ते १५ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत दोन आठवडयांचे पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण आयोजित केले आहे.

* * * * * *